| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३८ वा | रविवार दिनांक १२ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### अवैध मांस विक्री करीता जवळ बाळगुन विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिरोज रा. मुन्शी प्लॉट उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि. ०९.०४.२०२६ रोजी मुन्शी प्लॉट येथील बाबा शेख याचे घरात उमरगा येथे गोवंशीय जनावराचे मांस सात किलो एकुण १,४०० किंमतीचे गोवंशीय जनावराचे मांस विक्री करण्याचे उद्दशाने स्वत:चे कब्जात बाळगलेला उमरगा पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

बेंबळी पोलीस ठाणे अंतर्गत यासीन रा. खिरणीमळा ता. जि. धाराशिव यांनी दि. ०९.०४.२०२६ रोजी बेंबळी उजणी रोडवरील समाधान हॉटेल जवळ ट्रक क्र एमएच १८ बीए०५१८ मध्ये पशुवैद्यक विभागाची पुर्वपरवानगी न घेता गोवंशाची बेकायदेशीरपणे कत्तल करन संशीयत गोमांस सात टन एकुण ८,४०,००० किंमतीचे वाहनासह १८,४०,००० किंमतीचे ताब्यात बाळगुन वाहतुक करीत असताना मिळून आला. यावरुन फिर्यादी नामे ओंकार सुधीर जाधव, वय २३ वर्षे, रा. अयोध्यानगर हाडको ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क),९(ए) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत महिंद्रा बोलेरो पिकअप क्र एमएच २५ एजे ५५३५ चा अज्ञात चालकाने दि. ०९.०४.२०२६ रोजी ०८.३० वा. सु. बोलेरो पिकअप मध्ये गोवंशीय जनावरांची बेकायदेशीरपणे कत्तल करुन संशयित गोमांस ६०० किलो एकुण १,०८,००० किंमतीचे वाहनासह ४,०८,००० किंमतीचे गोवंशीय जनावराचे मांस विक्री करण्याचे उद्दशाने वाहतुक करत असताना त्याचे वाहन पंम्चर झाल्याने सदरचे वाहन तेथेच सोडून पळून गेला आहे. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(क),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत शिवाजी उर्फ खंडू वय ४० वर्षे, रा.व्हंताळ ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०९.०४.२०२६ रोजी व्हंताळ ते बेटजवळगा जाणारे रोडचे डावे बाजूस असलेले पत्र्याचे शेडमध्ये अंदाजे ३,२०० किंमतीची ३२ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर रत्नाबाई वय ६५ वर्षे, रा.तुरोरी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.०९.०४.२०२६ रोजी झोपडपट्टीतील वडार गल्ली येथे त्याचे राहते घरासमोर तुरोरी येथे अंदाजे १,४०० किंमतीची १४ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदविले आहेत.

**झाडे लावा! झाडे जगवा!! झाडे तोड रोखा !!!**

# सामाजिक समता सप्ताहानिमित्त धाराशिव येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य शिबिर उत्साहात संपन्न



धाराशिव (जिमाका)- सामाजिक न्याय,आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे.त्यानुषंगाने अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व वंचित दुर्बल घटकातील व्यक्तींच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य करण्यासाठी राज्य शासनाकडून विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.या योजनांची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचावी तसेच जनजागृती निर्माण व्हावी या उद्देशाने दरवर्षी दि.८ ते १४ एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह साजरा करण्यात येतो.

या सामाजिक समता सप्ताहाच्या अनुषंगाने आज ११ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक न्याय भवन सभागृह,धाराशिव येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी वैद्यकीय तपासणी शिबिर,विशेष कार्य केलेल्या ज्येष्ठांचा तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्य करणाऱ्या बिगर सरकारी संस्थांचा सत्कार व गौरव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख व्याख्याते डॉ. संदीप तांबारे,जिल्हा आरोग्य विभाग व जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाचे डॉ.दत्ता भोसले,डॉ. विनोद बर्वे,डॉ.क्षितिजा बनसोडे, डॉ.विनय कुलकर्णी,डॉ.महेश काळे,डॉ.सुजित नायकल,डॉ. खन्ना तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष,सचिव व इतर मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त,सचिन कवले यांनी केले.प्रमुख व्याख्याते डॉ.संदीप तांबारे,संचालक आयुष व्यसन मुक्ती उपचार व संशोधन केंद्र, येरमाळा यांनी ज्येष्ठ नागरिकांनी या वयात तणावमुक्त जीवन कसे जगावे याबाबत मार्गदर्शन केले.डॉ. विनोद बर्वे यांनी हाडांची काळजी घेण्याबाबत,तर डॉ.विनय कुलकर्णी यांनी आयुष्मान कार्डचे महत्त्व व ते प्राप्त करण्याबाबत सविस्तर माहिती दिली.डॉ.दत्ता भोसले यांनी मधुमेह, शुगर व रक्तदाब यांसारख्या आजारांपासून बचाव व त्यानंतर घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महादेव महाराज अडसुळ,जिल्हा ज्येष्ठ नागरिक महासंघ यांनी ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या हक्कांबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार माधवसिंह राजपुत यांनी ज्येष्ठांनी या वयात आनंददायी जीवन कसे जगावे याविषयी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात विविध ज्येष्ठ नागरिक संघांचे अध्यक्ष,सचिव व पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास महाराज अडसुळ,अच्युतराव माने, माधवसिंह राजपुत,दिलीप पाटील (अध्यक्ष,ज्येष्ठ नागरिक महासंघ), अनिल पाटील,सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभार समाज कल्याण अधिकारी सनम लामकने यांनी मानले.

# हँड्स ऑन ट्रेनिंग मुळे खरीपासाठी सज्ज कृषी यंत्रणा

## नैसर्गिक शेतीवर तज्ज्ञांचा भर: विशेष खरीप कार्यशाळा



धाराशिव (जिमाका)- खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांपर्यंत अद्ययावत तंत्रज्ञान पोहोचवण्यासाठी कृषी विभाग सज्ज झाला आहे. आज,१० एप्रिल २०२६ रोजी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय,धाराशिव आणि कृषी विज्ञान केंद्र,तुळजापूर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष खरीप कार्यशाळेचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यशाळेत बीजप्रक्रिया,बियाणे उगवण क्षमता तपासणी,एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि नैसर्गिक शेती या विषयांवर क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपविभागीय कृषी अधिकारी श्री. महादेव आसलकर यांनी प्रास्ताविक करत खरीप हंगामाचे नियोजन आणि कार्यशाळेचे महत्त्व अधोरेखित केले.'हँड्स ऑन ट्रेनिंग' (क्रपवी-प ढीरळपळपस) वर विशेष भर देताना त्यांनी सांगितले की,केवळ तात्विक माहिती न घेता प्रत्यक्ष कृतीतून प्रशिक्षण घेतल्यास अधिकारी ते ज्ञान अधिक प्रभावीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवू शकतात.

तांत्रिक सत्रात कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञ श्रीमती. कसबे आणि श्री. झगडे यांनी मार्गदर्शन केले.यामध्ये बीजप्रक्रिया,बियाण्यांची उगवण क्षमता तपासणी याबाबत माहिती देत प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले.तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापन (खझच्) अंतर्गत पिकांवरील किडींचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विविध उपाययोजनांची माहिती देण्यात आली.एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन विषयावर जमिनीचे आरोग्य टिकवून ठेवत उत्पादकता वाढवण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

नैसर्गिक शेती तज्ञ श्री.विकास गोडसे यांनी उपस्थितांना नैसर्गिक निविष्ठा तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर केले.त्यांनी बिजामृत, जीवामृत,घन जीवामृत तसेच कीड नियंत्रणासाठी दशपर्णी अर्क, निमार्क,अग्न्यास्त्र,ब्रम्हास्त्र आणि निमास्त्र तयार करण्याच्या पद्धतींचे सविस्तर मार्गदर्शन केले.विशेषतः त्यांनी मांडलेली 'दहा ड्रम थेअरी' ही उपस्थितांच्या आकर्षणाचे केंद्र ठरली.

या कार्यशाळेस उपविभागातील विविध अधिकारी उपस्थित होते. त्यामध्ये श्री.आबासाहेब देशमुख (तालुका कृषी अधिकारी),श्री. ज्ञानेश्वर रितापुरे,श्री.महेश देवकते, श्री.राहुल दिवाने यांच्यासह सर्व मंडळ कृषी अधिकारी,उपकृषी अधिकारी आणि कृषी सहाय्यक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यशाळेमुळे आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळण्यास मदत होणार असून,नैसर्गिक शेतीचा प्रसार करण्याच्या दृष्टीने हे एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे मानले जात आहे.

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची उल्लेखनीय कामगिरी; महसूल वसुलीत ११४.५७ टक्के उद्दिष्टपूर्ती

धाराशिव (जिमाका) -उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांनी आर्थिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये शासनाने दिलेल्या महसूल उद्दिष्टानुसार ११४.५७ टक्क्यांपेक्षा जास्त महसूल वसुली करत उल्लेखनीय कामगिरी बजावली असून, या यशामुळे कार्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या कालावधीत कार्यालयाने केलेल्या विविध कामगिरीचा आढावा पुढीलप्रमाणे आहे. आर्थिक वर्ष २०२५ -२६ मध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव यांनी तब्बल १२६ कोटी ३० लाख रुपयांचा महसूल शासनास मिळवून दिला आहे.मागील वर्षीच्या ९७ कोटी ६२ लाख महसूल वसुलीच्या तुलनेत यंदा लक्षणीय वाढ नोंदविण्यात आली आहे. कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विशेष मेहनतीमुळे हे उद्दिष्ट साध्य झाले असून,शासनाने दिलेल्या उद्दिष्टापेक्षा अधिक म्हणजे ११४.५७ टक्के महसूल वसुली करण्यात यश आले आहे.

महसूल प्राप्तीमध्ये वाहन नोंदणीचा मोठा वाटा असून वर्षभरात एकूण ३८ हजार ६२४ वाहनांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये २६ हजार ७०८ दुचाकी,३ हजार ६२७ चारचाकी,५१५ ऑटोरिक्षा,१ हजार ५४८ मालवाहू वाहने, २७९ प्रवासी वाहने तसेच इतर वाहनांचा समावेश आहे.तसेच आकर्षक पसंती क्रमांक शुल्काद्वारे २ हजार ५५३ वाहनधारकांकडून ३ कोटी १९ लाख रुपयांचा महसूल जमा करण्यात आला आहे.

कार्यालयातील वायुवेग पथकानेही प्रभावी कामगिरी करत १९ हजार ४७५ दोषी वाहनांवर कारवाई केली असून ४ कोटी ५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

नवीन वाहनचालकांना मार्गदर्शन करण्यासाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव आणि CSR Box या संस्थेच्या माध्यमातून रस्ता सुरक्षेबाबत व्हिडिओ दाखवून प्रशिक्षण दिले जाते.एप्रिल २०२२ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण ७ हजार ५४३ नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले असून सुरक्षित रस्ते, सुरक्षित वाहने आणि सुरक्षित चालक घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रस्ता सुरक्षा सप्ताह अभियान २०२६ अंतर्गत दिनांक १ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत शहर व जिल्ह्यात विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. पादचाऱ्यांमध्ये अपघाताचे प्रमाण जास्त असल्याने "Walk on Right' या संकल्पनेचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच "Good Samaritans', "Use of Zebra Crossing' आणि दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट वापरण्याचे महत्त्व याबाबत जनजागृती करण्यात आली.

शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना वाहतूक नियम,चिन्हे, हेल्मेट व सीटबेल्ट वापर,वेग नियंत्रण तसेच अपघातांची कारणे व प्रतिबंधात्मक उपाय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.दुचाकी अपघातांमध्ये हेल्मेट न वापरल्यास मृत्यूची शक्यता वाढते,याची जाणीव करून देत व्यापक जनजागृती करण्यात आली.

याशिवाय,शिकाऊ अनुज्ञप्तीधारक, नागरिक तसेच ड्रायव्हिंग स्कूल चालक/मालक यांचेही प्रबोधन करण्यात आले.वाहनचालकांच्या आरोग्याचा अपघातांशी संबंध लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस,ट्रक, टेम्पो आणि रिक्षा चालकांसाठी मोफत नेत्र तपासणी,आरोग्य शिबिरे आणि रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

हेल्मेट वापरास प्रोत्साहन देण्यासाठी बुलेट धारकांची हेल्मेट रॅली व 'वॉकाथॉन'चे आयोजन करण्यात आले.तसेच सीटबेल्टचा वापर न करणाऱ्या वाहनांवर कारवाईसाठी राष्ट्रीय महामार्गावर विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

पोलीस विभाग,परिवहन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून अपघात प्रवण क्षेत्रांची पाहणी करून 'र्तीश्रपशीरलश्रश डॉीं' निश्चित करण्यात आले असून,त्या ठिकाणी तात्पुरत्या व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

या सर्व उपक्रमांमुळे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,धाराशिव हे महसूल वसुलीसह रस्ता सुरक्षा जनजागृतीतही आदर्श ठरत असल्याचे दिसून येत आहे.

# जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांच्याकडून आर्थिक मदत



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथे गेल्या पंधरा दिवसा पूर्वी अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने अनेक शेतकऱ्यांचे फळबागाचे व पिकांचे नुकसान झाले असून जनावरे दगावले होते . अश्या शेतकऱ्यांना अर्चनाताई पाटील यांच्याकडून आर्थिक मदत करण्यात आली.

जळकोट आणि परिसरात गेल्या पंधरा दिवसां पूर्वी अवकाळी पाऊस होऊन गारपिट झाली होती .या गारपीटही मुळे फळबागांचे व पिकांचे आतानोत नुकसान झाले होते .काढणीला आलेली ज्वारी, गहू, हरभरा आदी पिकांचे नुकसान झाले होते. तर अनेक शेतकऱ्यांच्या शेतात बांधलेली जनावरे गारपिटीमुळे दगावली होती . या संदर्भात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा पंचायत समीतिचे सदस्य अँड अशिष सोनटक्के यांनी तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय आमदार राणा जगतसिंह पाटील यांना सदर घटनेची माहिती सांगितली आणि आपण काहीतरी मदत या शेतकऱ्यांना करावी अशी विनंती केली. तात्काळ प्रशासनाला शेतकऱ्याच्या बांधावर जावून ज्याचे नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे करण्याचे आदेश दिले आणि प्रशासनाच्या वतीने पंचनामे ही करण्यात आले . व ज्या ज्या शेतकऱ्यांची व पशुपालकांचे जनावरे गारपिटीने दागवली होती . त्याबाबत माहिती दिली असता येथील पशुपालक मनिषा नंदकुमार गायकवाड याची गाय मरण पावली तर बसवराज छत्रे याची म्हैस दगावली होती आणि येथील युवक बालाजी विजय लोखंडे यास आर्धांगवायू झाल्याने तो विकलांग झाला असून त्यालाही आर्थिक साहय करण्यात आले . आमदार राणा जगतजीत सिंह पाटील यांच्या माध्यमातून जिल्हा परिषेदेच्या अध्यक्षा अर्चनाताई राणा जगजीत सिंह पाटील यांच्या वत्तीने नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना ड आशिष सोनटक्के यांच्या हस्ते प्रत्येकी दहा हजाराचा धनादेश देण्यात आला .यावेळी माजी सरपंच तमाणाप्पा माळगे, संजय अंगुले, अरविंद लोखंडे, अरुण लोखंडे ,सतिश माने, सागर लोखंडे, मंगेश सुरवसे, प्रविण जाधव, नागनाथ किलजे ,सतिश गायकवाड, नागनाथ लोखंडे सह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते . यावेळी शेतकरी व पशुपालकांनी आमदार राणा जगजीत सिंह पाटील व अर्चनाताई पाटील याची आभार मानले .

